सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १३६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २१ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## एव्हरेस्ट... ते समुद्राच्या विशालतेपर्यंत योग सर्वांसाठी : पंतप्रधान मोदी

### योग आपल्याला शिकवतो व्यक्ती एकाकी नाही तर निसर्गाचा भाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१विशाखापट्टणम**

आज दिव्यांग बांधव ब्रेल लिपीत योगशास्त्राचे अध्ययन करतात, शास्त्रज्ञ अंतराळात योगाचे सराव करतात, तरुण मित्र गावागावांत योग ऑलिंपियाडमध्ये सहभागी होतात. नौदलाच्या सर्व जहाजांवर अप्रतिम योग सत्रांचे आयोजन झाले आहे. ओपेरा हाऊसच्या पायऱ्यांपासून ते एव्हरेस्टच्या शिखरापर्यंत आणि विशाल समुद्रापर्यंत एकच संदेश आहे की, योग सर्वांसाठी आहे. सर्व सीमा आणि क्षमतेच्या पलीकडे योग आहे, अशा शब्दांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगाचे महत्व विशद केले.








आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विशाखापट्टणम (आंध्र प्रदेश) येथे योग सत्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आणि उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनीही सहभाग घेतला. यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' अशी आहे. याबद्दल बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, या वर्षीची थीम एक मौल्यवान सत्य सांगते. पृथ्वीवरील प्रत्येक घटकाचे आरोग्य परस्परांशी निगडित आहे. माणसांचे आरोग्य त्या मातीवर अवलंबून आहे जिथे अन्न तयार होते, त्या नद्यांवर जे आपल्याला पाणी पुरवतात, त्या प्राण्यांवर जे आपल्यासोबत परिसंस्थेत राहतात आणि त्या वनस्पतींवर ज्या आपल्याला पोषण देतात. योग आपल्याला या परस्परसंबंधांची जाणीव करून देतो, आपल्याला जगाशी एकरूप होण्याचा मार्ग दाखवतो आणि शिकवतो की आपण स्वतंत्र व्यक्ती नाही, तर निसर्गाचा भाग आहोत.

सध्याच्या जागतिक परिस्थितीवर भाष्य करताना पंतप्रधान म्हणाले, दुर्दैवाने आज जगभरात तणाव, अस्थिरता आणि अस्वस्थता वाढत आहे. अशा काळात योग आपल्याला शांततेचा मार्ग दाखवतो. योग मानवतेसाठी आवश्यक आहे, जो आपल्याला श्वास घेण्यास, समतोल साधण्यास आणि पुन्हा एकदा पूर्णत्वाकडे जाण्यास मदत करतो.

जगात योगाचा प्रसार करण्यासाठी, भारत आधुनिक संशोधनाद्वारे योगशास्त्राला अधिक बळकटी देत आहे. देशातील मोठ्या वैद्यकीय संस्था योगावर संशोधन करत आहेत. आधुनिक वैद्यकीय व्यवस्थेत योगाच्या वैज्ञानिक पैलूमध्ये स्थान मिळवण्यासाठी प्रयत्न आहे, असे मोदी म्हणाले. या आंतरराष्ट्रीय योग दिनाला मानवतेसाठी योगाची सुरुवात करा. हा दिवस आंतरिक शांती ही एक जागतिक धोरण बनू दे, जिथे योग केवळ वैयक्तिक सराव म्हणून नव्हे तर जागतिक भागीदारी आणि एकतेसाठी एक शक्तिशाली साधन म्हणून स्वीकारला जाईल. प्रत्येक देश आणि प्रत्येक समाजाने योगाला एक सामायिक जबाबदारी बनवावी आणि सामूहिक कल्याणासाठी एक सामान्य योगदान द्यावे, असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केले. विशाखापट्टणम येथे या योग कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांच्यासोबत मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले.

## फक्त घोषणा करण्यात पुढे, पण...

### मेक इन इंडियावरून राहुल गांधींचा पंतप्रधान मोदींवर हल्लाबोल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नवी दिल्ली**

काँग्रेसचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर मेक इन इंडिया उपक्रमावरून जोरदार टीका केली आहे. तसेच मेक इन इंडिया उपक्रमाच्या यशावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. तसेच भारताच्या आर्थिक आव्हानांसाठी खऱ्या अर्थाने अंमलबजावणी करण्याऐवजी फक्त घोषणाबाजी करण्यावर केंद्र सरकार लक्ष केंद्रित करत असल्याचा आरोप खासदार राहुल गांधी यांनी केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे फक्त घोषणा करण्यात पुढे असल्याचंही राहुल गांधींनी म्हटलं आहे.

खासदार राहुल गांधी यांनी मेक इन इंडिया संदर्भात एक्सवर ट्विट करत म्हटलं की, मेक इन इंडिया उपक्रमाच्या माध्यमातून कारखान्यांच्या उत्पन्नात वाढ होईल, तेजी येईल असं आश्वासन दिलं होतं. मग उत्पादन विक्रमी नीचांकी पातळीवर का आहे? तरुणांची बेरोजगारी का वाढली आहे? मग चीनमधून होणारी आयात दुप्पट का झाली आहे?, असे सवाल राहुल गांधी यांनी केंद्र सरकारला विचारले आहेत.

राहुल गांधींनी पुढे म्हटलं की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मेक इन इंडियावरील उपयांऐवजी घोषणा देण्यावर पुढे आहेत. २०१४ पासून उत्पादन आपल्या अर्थव्यवस्थेच्या १४ टक्क्यापर्यंत घसरलं आहे. भारताला एका मूलभूत बदलाची आवश्यकता आहे, जी प्रामाणिक सुधारणा आणि आर्थिक पाठिंब्याद्वारे लाखो उत्पादकांना सक्षम बनवेल, असंही राहुल गांधींनी म्हटलं आहे.राहुल गांधी यांनी केंद्र सरकारच्या 'मेक इन इंडिया' योजनेवर जोरदार टीका करताना ही योजना देशात खऱ्या अर्थाने उत्पादनाला चालना देण्यात पूर्णपणे अपयशी ठरल्याचं राहुल गांधींनी म्हटलं आहे. आज भारताचं उत्पादन जीडीपीच्या फक्त १४ टक्के असून उत्पादन मोठ्या प्रमाणात घसरण झाली आहे. त्याच वेळी तरुणांची बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे, दुसरीकडे चीनमधून होणाऱ्या आयातीत दुप्पट झाली आहे, असं म्हणत राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली आहे.

## मुख्यमंत्री फडणवीसांनी हजारो वारकऱ्यांसह केली योगासनं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१पुणे**

आज जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येत आहे. आंतरराष्ट्रीय योग दिन भारतासह महाराष्ट्रात देखील मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात शेकडो वारकऱ्यांबरोबर योग दिन साजरा केला आहे. राज्य सरकारच्या पुढाकाराने 'वारकरी भक्तीयोग' या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. वारकरी भक्तियोग या उपक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील प्रमुख उपस्थिती लावत हजारो वारकरी, विद्यार्थ्यांबरोबर योगासने केले आहेत. या



कार्यक्रमासाठी प्रशासनाने मोठी तयारी देखील केली होती.

या कार्यक्रमास मंत्रिमंडळातील माझ्या सहकारी माधुरीताई मिसाळ, खा.मेधाताई कुलकर्णी, आ.भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, सदानंद मोरे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, पिंपरी चिंचवडचे आयुक्त शेखर सिंह, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि विद्यापीठाच्या सल्लागार समितीचे सदस्य राजेश पांडे, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ.अशोक उबाळे यांच्यासह देहू-आळंदी देवस्थान समितीचे सर्व पदाधिकारी आणि प्रमुख दिंड्यांचे दिंडी प्रमुख, सर्व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

### श्रीकांत शिंदेंचाही योग सत्रात सहभाग

शिवसेना (शिंदे) पक्षाचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मुंबईत मरिन ड्राइव्ह या ठिकाणी आयोजित योग सत्रात सहभाग घेत शेकडो नागरिकांबरोबर योगासनं केली.

### नितिन गडकरी यांचाही योग दिनाच्या कार्यक्रमात सहभाग

भारतीय जनता पक्षाचे नेते तथा केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांनी आज आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त नागपूरच्या यशवंत स्टेडियम धंतोली येथील ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात सहभाग घेतला होता. यावेळी मंत्री नितिन गडकरी यांनी शेकडो नागरिकांबरोबर योगासनं केली.

## दिलेला एकही शब्द हे सरकार फिरविणार नाही, कर्जमाफीच्या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांची पुण्यात ग्वाही

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२१पुणे**

'या सरकारने दिलेला एकही शब्द हे सरकार फिरविणार नाही,' अशी ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना दिली. उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे महापालिका, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आण श्री संत तुकाराम महाराज संस्थान यांच्या वतीने जागतिक योग दिनानिमित्त 'वारकरी भक्तीयोग' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधला.



कर्जमाफीच्या मुद्द्याबाबत विचारले असता, 'कर्जमाफी कधी करायची याचे काही नियम आहेत, काही एक पद्धती आहे. हा निर्णयही सरकार उचित वेळी घेईल. या सरकारने दिलेला एकही शब्द हे सरकार फिरविणार नाही,' असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.धरण परिसरात झालेल्या जोरदार पावसामुळे धरणांतून होत असलेला विसर्ग आणि पुराच्या धोक्याकडे लक्ष वेधले असता, 'धरणांवर नेमण्यात आलेल्या अभियंते आणि अधिकाऱ्यांना दक्षतेचे आदेश देण्यात आले आहेत,' असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने जागतिक क्रमवारीत भरारी घेतली आहे. विद्यापीठातील प्राध्यापक भरतीसाठी शिक्षण विभागाकडून आवश्यक परवानग्या देण्यात आल्या आहेत. लवकरच विद्यापीठातील प्राध्यापक भरती प्रक्रिया पूर्ण करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## उपमुख्यमंत्री तेच, मंत्री तेच, आमदारही तेच; 'एक ना धड भाराभर चिंध्या'

### अजित पवारांवर चंद्रराव तावरेंची जोरदार टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१पुणे**

माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या प्रचाराच्या तोफा थंडावल्या असून २२ जून रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवारांनी चांगलीच कंबर कसल्याचं दिसतंय. त्याचवेळी त्यांचे विरोधक आणि सहकार बचाव पॅनलचे प्रमुख चंद्रराव तावरे यांनी अजित पवार यांच्यावर निशाणा साधलेला आहे. उपमुख्यमंत्री मीच, आमदार मीच, सगळं मीच...अरे चाललंय काय? असा प्रश्न तावरेंनी विचारला. अजित पवारांची 'एक ना धड भाराभर चिंध्या' अशी अवस्था झाल्याची टीकाही त्यांनी केली.

'मीच करू शकतो असं आम्ही कधीच म्हणालो नाही आणि म्हणणारही नाही. आमचं आणि अजित पवारांचं वैचारिक भांडण आहे. उपमुख्यमंत्री तेच, मंत्री तेच, आमदार तेच, सगळंच त्यांना पाहिजे', असं म्हणत चंद्रराव तावरेंनी अजित पवारांवर निशाणा साधला आहे.

चंद्रराव तावरे म्हणाले की, 'गेल्या काही दिवसांपासून अजित पवार मी हे करू, ते करू सांगत आहेत. पण अजित पवार फक्त बोलतात, काही करत नाही,' असा खोचक टोला चंद्रराव तावरे यांनी लगावला.

## ठाकरेंच्या 'कम ऑन किल मी'वर अमृता फडणवीस स्पष्टच म्हणाल्या

### 'आपला शांतताप्रिय देश आहे आणि शांतताप्रिय पक्ष सत्तेत आहे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१मुंबई**

शिवसेना वर्धापन दिनाच्या दिवशी मुंबईत ठाकरे गट आणि शिंदे गट या दोघांचे मेळावे झाले. दोन्ही मेळाव्यांमध्ये सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप झाले. यावेळी ठाकरे गटाच्या मेळाव्यात उद्धव ठाकरेंनी सत्ताधारी महायुतीच्या तिन्ही पक्षांवर हल्लाबोल केला. देवेंद्र फडणवीसांना लक्ष्य करताना त्यांनी मी पुन्हा येईन या



वक्तव्याची पुन्हा खोचक शब्दांत आठवण करून दिली. याबाबत विचारणा केली असता देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी सूचक शब्दांत उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर दिलं आहे.

'आपला शांतताप्रिय देश आहे आणि शांतताप्रिय पक्ष सत्तेत आहे.', असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस म्हणाल्या. तर आपल्याला कुणी मारेल असा विचार करण्याची गरज नाही, असं म्हणत अमृता फडणवीसांनी उद्धव ठाकरे यांच्या कम ऑन किल मी या वक्तव्यावर अमृता फडणवीस यांची ही प्रतिक्रिया आहे.

शिवसेनेच्या मेळाव्यात प्रहार सिनेमाचा उल्लेख करत उद्धव ठाकरे म्हणाले, 'मी या गद्दारांच्या समोर उभा आहे आणि सांगतो त्यांना मी कम ऑन किल मी.. असेल हिंमत तरी या अंगावर फक्त अंगावर येणार असेल अँबुलन्स घेऊन या. कारण येताना सरळ याल जाताना आडवे होऊन जाल.' असं म्हणत उद्धव ठाकरेंनी शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या भाषणातून शिंदेंवर हल्लाबोल केला. यावरूनच अमृता फडणवीस यांनी पलटवार केलाय.

## शशी थरूर भाजपात जाणार? काँग्रेस २३ जूनला मोठा निर्णय घेणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नवी दिल्ली**

पहलगाम हल्ल्यानंतर भारताची शिष्टमंडळे जगभरात पाकिस्ताचा दहशतवादाचा बुरखा फाडण्यासाठी रवाना झाली होती. या पाच शिष्टमंडळांपैकी तीन सत्ताधारी आणि दोन विरोधक या शिष्टमंडळांचे नेतृत्व करत होते. यामध्येच एक काँग्रेसचे खासदार शशी थरूर होते. त्यांनी काँग्रेसना न पटणारी विधाने केली होती. आता त्यांच्यावर कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



आपल्याला फक्त त्या हल्ल्यांबद्दल माहिती मिळते जे आपण उधळून लावण्यात अयशस्वी झालो. कोणत्याही देशात ही एक सामान्य गोष्ट आहे. कोणत्याही देशाकडे विश्वासार्ह गुप्तचर यंत्रणा नाही, असे त्यांनी म्हटले होते. एकप्रकारे पहलगाम हल्ल्यावर केंद्र सरकारला थरुर यांनी परदेशात जाऊन क्लीन चिट दिली होती. यावरून काँग्रेस नाराज झाली होती. अनेक नेत्यांनी थरुर यांच्यावर टीका केली होती. तेव्हा थरूर यांनी सध्या मला यावर बोलण्यास वेळ नाही, आल्यावर पाहू, असे म्हणत प्रत्युत्तर दिले होते.

थरुर आणि काँग्रेस हायकमांड यांच्यात २०२० पासूनच मतभेद आहेत. शशी थरूर हे जी-२३ नावाच्या नेत्यांपैकी एक होते, जे संघटनेत बदल घडवून आणण्याचा पुरस्कार करत होते. या गटातील नेत्यांनी राहुल गांधींच्या नेतृत्वाला आव्हान दिले होते. आतापर्यंत गुलाम नबी आझाद आणि कपिल सिब्बल यांना पक्ष सोडावा लागला आहे. मनीष तिवारी आणि शशी थरूर सारख्या नेत्यांना देखील बाजुलाच करण्यात आले आहे. पाकिस्तान विरोधात जाणाऱ्या या शिष्टमंडळात सहभागी करण्यासाठी काँग्रेसने वेगळ्याच नेत्यांची नावे दिली होती. परंतू, मोदींनी थरूर यांच्यासह चार नेते निवडले ज्यांचे त्या यादीत नाव नव्हते. काँग्रेसला आता ही गोष्टी देखील खटकू लागली आहे. यामुळे शशी थरूर यांच्यावर कारवाई झालीच तर त्यांना भाजपा पक्षप्रवेशाची ऑफर देण्याची शक्यता आहे.

## संपादकीय ......

# योगचिकित्सा : मानवजातीसाठी संजीवनी

आहार-विहार, आचार-विचारांच्या समतोलातून जीवन सुखी बनविणे हाच योगशास्त्राचा मूलमंत्र आहे. अनेक दुर्धर आजार आणि मनःकायिक विकारांवर योगशास्त्र प्रभावी ठरले आहे. औषधोपचारांना साह्यभूत प्रणाली म्हणून योगचिकित्सेला जसे महत्त्व आहे, तसेच शस्त्रक्रिया आणि विविध आजारांमधून बरे झाल्यानंतर प्रकृती पूर्ववत होण्यासाठीही योग उपयुक्त ठरतो. त्यामुळे २१ जून रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जातो.

वैद्यकीय योगाभ्यास ही नवोदय योगचिकित्सा पद्धती अनेक आजार सौम्य आणि बरे करण्यासाठी उपयुक्त ठरत असल्याने तिचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. औषधोपचारांना साह्यभूत ठरणारा घटक म्हणून या चिकित्सेचा चांगला उपयोग होतो. विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया तसेच अर्धांगवायूसारख्या दुर्धर आजारांनंतर रुग्णाची प्रकृती जलदगतीने पूर्ववत होण्यासाठी ही चिकित्सा उपयुक्त ठरते. पाठीचा कणा आणि संलग्न स्नायूंशी संबंधित स्पॉन्डिलायटिस, स्लिप्ड डिस्क, अथ्रोयटिस, फ्रोझन शोल्डर अशा अनेक विकारांमध्ये ही चिकित्सा बहुगुणी ठरते. अस्थमा, हायपरटेन्शन, आयएचडी, इन्सोम्निया, डिप्रेशन असे मनःकायिक आजार बरे होण्यास योगचिकित्सेची मोठी मदत होते. योगचिकित्सेत परिमार्जन (शुद्धीक्रिया), आसन, प्राणायाम, ध्यान याबरोबरच आहार मार्गदर्शन आणि समुपदेशनाचा अंतर्भाव होतो. शारीरिक कोश, जैव अथवा प्राणभूत कोश, मस्तिष्क कोश, बौद्धिक कोश आणि आध्यात्मिक कोश अशा पाचही मानवी कोशांवर योगचिकित्सा पायरीपायरीने प्रभाव दाखविते.

मानवी शरीराच्या सर्व संस्था आणि अवयव म्हणजे शारीरिक कोश. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली केलेली आसने आणि आहारविषयक सल्ला या कोशावर प्रभावी ठरतो. शरीरातून विषारी द्रव्ये बाहेर टाकण्यासाठी, उत्तम रक्ताभिसरणासाठी, तसेच शरीरातील प्रत्येक पेशीपर्यंत प्राणवायूचा आणि पोषक द्रव्यांचा पुरवठा योग्य रीतीने होण्यासाठीही त्याचा उपयोग होतो. असे घडल्यास पेशींचा कायाकल्प होऊन कार्यक्षमता वाढते. सर्व स्नायू, रक्तवाहिन्या आणि अवयवांवर प्रभाव होत असल्याने पेटके, वेदना आणि कार्यान्वयनातील अडथळे दूर होतात. संप्रेरकांच्या स्रावात संतुलन निर्माण झाल्याने शरीरक्रिया सुरळीत होतात.

अनुरूप प्राणायामाच्या नियमित सरावाने शरीर आणि मनाच्या सर्व ऐच्छिक आणि अनैच्छिक हालचालींवर नियंत्रण मिळविता येते. विचारांमध्ये स्पष्टता येते. ज्ञानेंद्रिये, इंद्रिये, मन, स्वत्त्व तसेच प्रज्ञा आणि प्रेरणा बहाल करणारी इंद्रिये यामध्ये योग्य समन्वय निर्माण होतो. या प्राणायामांमध्ये कुंभकासह आणि कुंभकाविना केल्या जाणार्या विविध प्रकारच्या जलद आणि मंद श्वसनतंत्रांचा समावेश होतो. ध्यानधारणेच्या (ध्यानाचे विविध प्रकार) नियमित सरावाने मन स्थिर होण्यास मदत होते. भावना आणि प्रतिक्रियांवर नियंत्रण मिळविता येते. द्वैत आणि अस्पष्टता समाप्त होते. चित्त आणखी स्थिर, संवेदनशील, तरल आणि एकाग्र होते. मस्तिष्क कोशातील असमतोल दूर होण्यास ध्यानामुळे मदत होते.

मानसिक शांततेच्या परिणामस्वरूप व्यक्तीची मीमांसक शक्ती, ग्रहण क्षमता, विचार प्रक्रिया वृद्धिंगत होते. त्यामुळे पुस्तके, गुरू आणि अनुभवांतून अधिकाधिक ज्ञान ग्रहण करण्यास मदत होते. बुद्धी कुशाग्र बनते. निर्णय क्षमता वाढते. ज्ञानाची कमतरता हेच जीवनातील अनेक दुःखे आणि हालअपेष्टांचे मुख्य कारण ठरते, असा अनुभव आहे. कुशाग्र बुद्धी आणि सक्षम बौद्धिक कोशाच्या साह्याने यावर मात करता येणे शक्य असते. अनेक मनःकायिक आजार या मार्गाने बरे होण्यास प्रारंभ होतो. दुखणी, शंका-कुशंका, अस्पष्टता, भावनिक असमतोल दूर झाल्यानंतर व्यक्तीला शाश्वत सुखाची आणि परमानंदाची अनुभूती मिळते. आजाराच्या मुळावरच आक्रमण करून योगचिकित्सा खोलवर परिणाम करते. त्यामुळेच अनेक जुनाट, मनःकायिक आजारांमधून बाहेर पडण्यासाठी ही चिकित्सा अत्यंत प्रभावी ठरते.

# अर्ज केले, व्हेंडर निवडले, पैसे भरले, तरी सौर पंप येईना घरी...




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती** – शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेली 'मागेल त्याला सौर कृषिपंप' ही योजना राज्य सरकारने सुरू केली आहे. मात्र पैसे भरून चार महिने झाले तरी कंपनीकडून सौर पंपाचा पुरवठा केला जात नसल्याने शेतकरी संभ्रमात पडले आहेत.

शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा विनामूल्य वीज उपलब्ध व्हावी, या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ३, ५ आणि ७.५ एचपी क्षमतेचे पंप दिले जातात. या पंपाचा पुरवठा करण्यासाठी अनेक कंपन्या उपलब्ध आहेत.

मागील अनेक महिन्यापासून तालुक्यात अनेक शेतकऱ्यांनी शुल्क भरणा करून कंपनीचीही निवड केली आहे. मात्र अशा शेतकऱ्यांना जवळपास दोन ते तीन महिन्यांहून अधिक कालावधी होऊनही सौर पंप दिला जात नसल्याने ही योजना मृगजळ ठरल्याची चर्चा आहे.शेतकऱ्यांना महावितरण कंपनी दिवसा व रात्री अशा सत्रात शेतीसाठी ८ तास वीजपुरवठा देते, तोही कमी दाबाचा असतो. त्यामुळे शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यासाठी अडचण येत होती. परंतु दिवसा वीज उपलब्ध व्हावी, जेणेकरून शेतकऱ्यांना रात्री शेतात पिकांना पाणी देताना अनेक हिंस्र प्राणी, साप, आर्दीपासून जीविताला धोका उत्पन्न होणार नाही, असे शेतकऱ्यांनी म्हटले होत. यासाठी राज्य शासनाने 'मागेल त्याला सौर पंप' ही योजना आणली.

> 'मागेल त्याला सौर पंप' या योजनेंतर्गत मी ३ एचपी पंपासाठी अर्ज केला होता व मंजूरही झाला. त्यासाठी मी नियमानुसार शुल्क भरणा करून कंपनीचीही निवड एप्रिल २५ मध्ये केली; परंतु अद्यापही सौर पंप बसविण्यात आलेला नाही.
> **– किशोर पाटील, शेतकरी**

### क्षेत्रानुसार मिळतोय क्षमतेचा सौर कृषी पंप


मागेल त्याला सौर पंप या योजनेंतर्गत सर्वसाधारण प्रवर्गातील शेतकऱ्यांना ४० आर. ते १ हेक्टर क्षेत्रासाठी ३ एचपीचा पंप खर्च २२,९७५ रुपये १ ते २ हेक्टरसाठी ५ एचपीचा पंप ३२ हजार १०० व ५ हेक्टर पेक्षाजास्त ७.५ एचपीचा पंप ४५ हजार रुपये शुल्क भरून सौर पंप उपलब्ध करून दिले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना रात्री शेतात जाण्याची गरज नाही.

### विशिष्ट प्रवर्गानुसार भरावी लागतेय रक्कम

सर्वसाधारण प्रवर्गातील शेतकऱ्यांना सौर कृषिपंप किमतीच्या १० टक्के, तर अनुसूचित जाती-जमातींच्या शेतकऱ्यांना ५ टक्के रक्कम भरून सौर पंपाचा पूर्ण संच दिला जातो. उर्वरित रक्कम राज्य व केंद्र सरकारकडून अनुदान म्हणून दिली जाते. परंतु या योजनेंतर्गत अनेक कंपन्या शेतकऱ्यांना शुल्क भरणा, कंपनी निवडूनही सौर पंप बसविण्यास टाळाटाळ करीत आहेत.




# कोलेस्टेरॉलच्या रूग्णांसाठी डाळिंब एक बेस्ट फळ



**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

आजच्या धावपळीच्या जीवनात हृदयासंबंधी वेगवेगळी आजार होणं फारच कॉमन झालं आहे. पूर्वी वयोवृद्ध लोकांनाच हृदयरोग अधिक व्हायचे. पण आजकाल तर तरूण देखील या आजारांनी पीडित होत आहेत. खासकरून हाय कोलेस्टेरॉलची समस्या खूप जास्त वाढत आहे. यामागे खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी आणि चुकीची लाइफस्टाइल यांचा ही मुख्य कारणं सांगितली जातात. याच कारणानं अनेक हेल्थ एक्सपर्ट कोलेस्टेरॉल वाढल्यावर आहारात आणि लाइफस्टाइलमध्ये बदल करण्याचा सल्ला देतात.

**कोलेस्टेरॉलच्या रूग्णांसाठी बेस्ट फळ**

प्रसिद्ध न्यूट्रिशनिस्ट दीपशिखा जैन यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर एक व्हिडीओ पोस्ट करून या फळाबाबत माहिती दिली आहे. त्यांच्यानुसार, रोज एक डाळिंब खाऊन बॅड कोलेस्टेरॉल बरंच कमी करता येऊ शकतं. तुमच्या शरीरात आधीच कोलेस्टेरॉल वाढलं असेल तर डाळिंबाच्या मदतीनं ते नसांमधून बाहेर काढलं जाऊ शकतं.

कसा मिळतो फायदा?

न्यूट्रिशनिस्ट सांगतात की, डाळिंबामध्ये भरपूर अँटी-ऑक्सिडेंट्स असतात. जसे की, पॉलिफेनॉल्स आणि ॲलेजिक ॲसिड, जे शरीरातील बॅड कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करतात. बॅड कोलेस्टेरॉल हळूहळू रक्तवाहिन्यांमध्ये जमा होऊन त्या ब्लॉक करू लागतं. ज्यामुळे हार्ट ॲटॅक किंवा स्ट्रोकचा धोका वाढू शकतो. अशात डाळिंब ही प्रक्रिया थांबवण्यास मदत करू शकतं.

दीपशिखा जैन यांच्यासोबतच अनेक शोधांमधूनही हे समोर आलं आहे की, डाळिंब कोलेस्टेरॉलच्या समस्येत प्रभावी ठरतं. डाळिंब नियमित खाल तर हृदयासंबंधी आजार रोखण्यास मदत मिळते.

रोज सकाली आपल्या दिवसाची सुरूवात तुम्ही एक डाळिंब खाऊन करू शकता. पण बाजारात मिळणारे याचे पॅकेटमधील ज्यूस टाळावे. या ज्यूसमध्ये शुगर जास्त असते, ज्यामुळे याचा प्रभाव उलटा पडू शकतो.

# गोगलगायीच्या नियंत्रणासाठी करा हे सोपे ५ उपाय; जाणून घ्या सविस्तर

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

गोगलगाय ही बहूभक्षी किड असून ती विशेषतः रोपावस्थेत पिकाचे अधाशासारखे पाने खाऊन अतोनात नुकसान करते. निशाचर असल्याने रात्रीच्या वेळी बाहेर पडलेल्या गोगलगायी रोपांची पाने खातात व शेताचे नुकसान होते.गोगलगायी जून ते सप्टेंबर या काळात अत्यंत सक्रिय असतात व रोपावस्थेतील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करतात त्यामुळे पीक संपूर्ण नष्ट होते.

**गोगलगायी नियंत्रणासाठी करा हे उपाय–** सायंकाळी किंवा सूर्योदयापूर्वी शेतातील गोगलगायी गोळा करून साबणाच्या अथवा मिठाच्या पाण्यात बुडवून माराव्यात किंवा शेतातून मोठ्या शंखी गोगलगायी जमा करून प्लास्टिकच्या पोत्यात भरून त्यात कोरडे मीठ अथवा चुना टाकून त्या पोत्याचे तोंड उघडे न ठेवता घट्ट बंद करावे, जेणेकरून त्यामधील गोगलगायी पोत्यातून बाहेर न जाता मिठाच्या किंवा चुन्याच्या संपर्कात येऊन आतमध्येच मरून जातील.

गोगलगायी जमा करताना अथवा हाताळणी करताना उघड्या हाताने न करता हातमोजे व तोंडावर मास्क घालूनच करणे गरजेचे आहे.

शेतामध्ये किंवा बागेमध्ये ७ ते ८ मीटर अंतरावर वाळलेल्या गवताचे किंवा भाजीपाला पिकाच्या अवशेषाचे ढीग अथवा गोणपाट गुळाच्या पाण्यात ओले करून शेतात ठिक ठिकाणी ठेवावेत. गोगलगायी त्या ठिकाणी आश्रयाला जातात. सूर्योदयानंतर त्याखाली गोळा झालेल्या गोगलगायी व त्यांची अंडी गोळा करून मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट करावी. लहान शंखीच्या नियंत्रणासाठी १० टक्के मिठाची (१०० ग्रॅम प्रति १ लिटर पाणी) फवारणी फायदेशीर दिसून आली आहे.बोर्डो मिश्रण (१ किलो मोरचूद १ किलो चुना + १०० लिटर पाण्यात), कॉपर सल्फेट म्हणजेच मोरचूद (३०० ग्रॅम १० लिटर पाण्यात) किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड (२५ ग्रॅम १० लिटर पाण्यात) इत्यादीच्या फवारण्या गोगलगाय नियंत्रणासाठी नोंदणीकृत नाहीत, परंतु गोगलगाय नियंत्रणासाठी किंवा त्यांना अटकाव करण्यासाठी फळबागेत काही प्रमाणात परिणामकारक आहेत.अशाप्रकारे शंखी गोगलगायींचा प्रादुर्भाव ज्या भागात मोठ्या प्रमाणात दिसून येत असेल त्या भागातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामूहिकरित्या वरीलप्रमाणे उपाययोजना पावसाळ्याच्या सुरवातीपासूनच केल्यास गोगलगायीचे नियंत्रण अधिक प्रभावीपणे होते.




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# आरटीओ अधिकाऱ्याच्या घराचे सीसीटीव्ही कॅमेरे चोरले

## कठोरा भागातील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक :दि.२१अमरावती** अज्ञात चोरट्याने मध्यरात्रीच्या सुमारास आरटीओ कार्यालयात कार्यरत असलेल्या महिला अधिकाऱ्याच्या घराबाहेर लागलेले सुमारे २५ हजार रूपये किमतीचे ४ सीसीटीव्ही कॅमेरे चोरून नेले. गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या कठोरा भागातील विठ्ठलवाडी नगरात राहणाऱ्या वृषाली निलेश दहेकर यांच्या घरी ही घटना घडली. वृषाली यांची भंडारा येथे बदली झाल्याने त्या रूजू होण्यासाठी गेल्या होत्या. परत आल्यावर ही घटना त्यांना दिसली. डीव्हीआरमधील फुटेजमध्ये ४ चोरटे चोरी करित असल्याचे दिसतात. त्यानुसार पोलिसांनी चार आरोपींविरोधात गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करीत आहे.–



# गाडगेनगर हद्दीत एमडीची विक्री, दोन ड्रग्स पेडलरला अटक

## ३१.५८० ग्रॅम एमडी जप्त : पोलिस आयुक्तांच्या सीआययू पथकाची दबंग कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती–** गाडगे नगर हद्दीत एमडीची खुलेआम विक्री करणाऱ्या दोन ड्रग्स पेडलरला अटक करण्यात पोलिस आयुक्तांच्या 'सीआययू' विशेष पथकाला यश मिळाले. एमडी ड्रग्ज विक्रीसाठी जात असलेल्या दोघांना सीआययू पथकाने १९ जून रोजी रात्री वलगाव मार्गावरून अटक केली. त्यांच्याकडून ३१.५८० ग्रॅम एमडी ड्रग्जसह दोन दुचाकी, मोबाइल व रोख असा ४ लाख २६ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शेख अयान शेख रमजान (१९) रा. हबीबनगर, अमरावती व सय्यद आफाक सय्यद निझाम (२०) रा. ताजनगर क्र. १, अमरावती अशी अटक आरोपींची नावे आहेत. एफआयआरनुसार, शेख अयान व सय्यद आफाक हे दोघे एमडी ड्रग्जचे पाऊच बाळगून विक्री करण्याकरिता दुचाकीने वलगाव मार्गावरील धर्मकाट्या कडून नागपुरी गेटकडे येणार असल्याची माहिती गस्तीवर असलेल्या सीआययू पथकाला मिळाली. त्या आधारे पथकाने वलगाव मार्गावर सापळा रचून शेख अयान व सय्यद आफाक यांना ताब्यात घेतले. अंगझडती तसेच दोन्ही दुचाकींच्या डिक्कीची पाहणी केल्यावर त्यांच्याजवळ २ लाख २२ हजार रुपये किमतीची ३१.५८० ग्रॅम एमडी ड्रग्ज आढळून आली. त्यानुसार पथकाने या दोघांना अटक करून त्यांच्याकडून एमडी ड्रग्ज, दोन दुचाकी, दोन मोबाइल व १४ हजार २६० रुपये रोख असा एकूण ४ २६ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. त्यांच्याविरुद्ध गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई सीआययू युनिटचे प्रमुख तथा सहायक पोलिस निरीक्षक महेंद्र इंगळे, अंमलदार सुनील लासूरकर, सुधीर गुडधे, जहीर शेख, अतुल संभे, राहुल ढेंगेकर, विनोद काटकर यांनी केली.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २१ जून २०२५

शहर/ग्रामिण

# सरन्यायाधीश भूषण गवई यांचे चार्टर्ड विमानाने २५ ला होणार आगमन

## जिल्हा वकील संघाची भव्य नागरी सत्काराची जयत तयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**

अमरावतीचे भूमीपुत्र आणि भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई हे २४ किंवा २५ जूनला विशेष विमानाने विदर्भात येऊ शकतात. त्यांचा अमरावती दौरा हवामान पाहून ठरवला जाईल. २५ जून रोजी सायंकाळी ६ वाजता कठोरा रोड येथील पोटे कॉलेज ग्रुपच्या स्वामी विवेकानंद सभागृहात हा नागरी सत्कार आयोजित करण्यात आला आहे.



जिल्हा बार असोसिएशनमध्ये या कार्यक्रमामुळे उत्साह संचारला आहे. सरन्यायाधीशांची रक्ततुला करण्यासाठी बार असोसिएशनकडून रक्तदान शिबिर घेतले जात आहे. यात महिला वकिलांसह तरुणांमध्ये रक्तदानासाठी खूप उत्साह दिसून येत आहे. सरन्यायाधीश गवई यांचे स्वागत नेत्रदीपक असेल, असे नियोजन केले जात आहे. २५ जूनला पोटे कॉलेजच्या विवेकानंद सभागृहात होणाऱ्या ऐतिहासिक सत्काराला उच्च न्यायालयाचे तीन वरिष्ठ न्यायाधीशही उपस्थित राहणार आहेत. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतीलः न्यायमूर्ती नितीन सांबरे, न्यायमूर्ती अनिल किलोर, न्या. प्रवीण पाटील, जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगडा यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे तसेच बार कौन्सिल ऑफ इंडियाचे पालक सदस्य ॲड. देशमुख बार कौन्सिल महाराष्ट्र अँड गोवाचे पालक सदस्य ॲड. परिजात पांडे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

### विशेष सन्मानचिन्ह

देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या सन्मानार्थ विशेष सन्मानचिन्ह वकील संघाच्यातर्फे देण्यात येणार आहे. नागरी सत्कार भव्य दिव्य होणार असून वकील संघाचे पदाधिकारी सदस्य ऐतिहासिक सत्कार सोहळ्याला यशस्वी करण्याकरिता कार्यरत आहेत. यामध्ये अध्यक्ष ॲड. सुनील देशमुख, उपाध्यक्ष ॲड. आशिष लांडे, सचिव अमोल मुरल, ग्रंथालय सचिव ॲड. विद्या मानके, कार्यकारणी सदस्य ॲड. ऋषिकेश उपाध्ये, सुमित शर्मा, ॲड. अक्षय बोले, नेतल मल्ला, आशिष सिंह परिहार, विशाखा तागडे पाटील, पूनम रिठे यांच्यासह अन्य पदाधिकारी सदस्य सोहळ्याच्या यशस्वी करिता परिश्रम घेत आहेत.

### सरन्यायाधीशांना झेड सुरक्षा्

सरन्यायाधीशांसाठी झेड सुरक्षा असून त्या संदर्भात जिल्हा वकील संघाचे पदाधिकारी आणि पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्यात विशेष चर्चा होणार आहे. सर्व प्रकारची तयारी आता अंतिम टप्प्यात आहे. सर्वांनी आपापल्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या आहेत. आपापल्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात सर्वजण व्यग्र आहेत. सरन्यायाधीशांचा जीवनप्रवास दाखविणाऱ्या व्हिडिओ क्लिप देखील तयार करण्यात आलेल्या आहेत.


# शहर स्वच्छतेसह मनपाला आर्थिक मजबूत करणार

## मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी कामकाजाची दिशा केली स्पष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती–**

अमरावती महानगरपालिका आयुक्त पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी स्वतःच्या पातळीवर अमरावती शहराची पाहणी केली आणि शहरात स्वच्छतेबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी असल्याचे सांगितले. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाईल तर दूसरीकडे महापालिकेला आर्थिक मजबूत करण्यासाठी सुद्धा शर्थीचे प्रयत्न करणार असल्याचे मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी सांगितले.

अमरावती महानगर पालिकेच्या नवनियुक्त आयुक्त आणि प्रशासक सौम्या शर्मा यांनी गुरुवारी पदभार स्वीकारला आणि आढावा बैठका घेतल्या. शुक्रवारी त्यांनी शहराच्या परिस्थितीचा थेट आढावा घेण्यासाठी सकाळी शहराचा फेरफटका मारला आणि माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदही बोलावली. या पत्रपरिषदेच्या सुरुवातीला प्रशासक सौम्या शर्मा यांनी त्यांचा वैयक्तिक परिचय करून देत पत्रकार परिषदेला संबोधित केले.



महानगरपालिकेचे कामकाज पारदर्शक आणि जलद करण्या वर त्या लक्ष केंद्रित करतील. याअंतर्गत, त्या लवकरच त्यांच्या सर्व विभाग प्रमुखां सोबत बैठक घेऊन महानगर पालिकेत सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतील आणि कामात सुधारणा करण्यासाठी आवश्यक सूचना देतील. यासोबतच, सामान्य नागरिका ना त्यांच्या कामासाठी महानगर पालिकेत वारंवार येरझारा कराव्या लागू नयेत म्हणून कामाचे विकेंद्रीकरण देखील केले जाईल. महापालिकेच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी महापालिकेचे एकमेव मुख्य स्त्रोत असलेल्या मालमत्ता कर वसुलीला गती देण्यात येईल तसेच महापालिकेच्या मार्केटचा रखडलेला विषयसुद्धा मार्गी लावून मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यात येईल. जेणेकरून महापालिकेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन हे नियमित होईल. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये काम करताना उत्साह निर्माण होईल. सध्या अमरावती महानगरपालिका झोननिहाय कंत्राट पद्धतीने स्वच्छतेचे काम करत असताना आणि या कंत्राट पद्धतीने अनेक अनियमितता आढळून येत असताना, आयुक्त सौम्या शर्मा म्हणाल्या की, कंत्राट पद्धतीने कोणतेही काम करण्यात काहीही गैर नाही. परंतु कंत्राटदारांना मनमानी करू दिली जाणार नाही. जर अमरावतीमध्ये असे घडत नसेल तर आम्ही कंत्राटदारां मार्फतच काम योग्यरित्या करू. महानगर पालिका परिसरातील कंपोस्ट डेपो आणि घनकचरा प्रकल्पाची सर्व तयारी पूर्ण झाली असल्याचे ही त्या यावेळी म्हणल्यात.

# अमरावती वकील संघातर्फे स्वयंस्फूर्तीने रक्तदान

## सरन्यायाधीश भूषण गवई यांचा २५ जूनला सत्कार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती,–** अमरावती वकील संघातर्फे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार समारंभ २५ जून २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता स्वामी विवेकानंद सभागृह, आर. पोटे इंजिनीअरींग पी. महाविद्यालयाच्या परिसरामध्ये आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे औचित्य साधून अमरावती वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुनिल देशमुख व कार्यकारणीव्दारे भव्य रक्तदान शिबीराचे २० व २१ जून २०२५ रोजी वकील संघाच्या मुख्य सभागृहामध्ये आयोजन करण्यात आले. अमरावती वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुनिल देशमुख, उपाध्यक्ष ॲड. आशिष लांडे, सचिव ॲड. अमोल मुरळ, ग्रंथालय सचिव विद्या मानके व कार्यकारीणी सभासद ॲड. ऋशिकेश उपाध्ये, ॲड. सुमित शर्मा, ॲड. अक्षय बोळे, ॲड. नेतल मल्ला, ॲड. आशिष परीहार, ॲड. विशाखा तागडे, ॲड. पुनम रिठे, न्या. भूषणजी गवई यांच्या मातोश्री श्रीमती कमलताई गवई, रक्तदान समितीशिबिरात किशोर शेळके, ॲड. प्रदिप उत्साहाने चांडक, सतीश सारडा, विवेकअमरावतीचे महेंद्र भुतडा, यांचे प्रमुख उपस्थितीत विधीवत्त रक्तदान शिबीराला सुरुवात करण्यात आली. रक्तदान शिबीरात वकील बांधव व भगिनींनी उस्फुर्त सहभाग घेतला. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन व्ही. एस. लढा, मा. देवरणकर, ॲड. प्रशांत देशपांडे, ॲड. अनिल विश्वकर्मा, काळे, ॲड. प्रविण ठाकरे, ॲड. धिरज रानोटकर, ॲड. कार्तिक देशमुख, ॲड. ऋतुराज भोरे आदी वकील संघाचे सदस्य शिबिरा दरम्यान उपस्थित होते. या रक्तदान शिबीरामध्ये न्या. भूषण गवई यांच्या मातोश्री कमलताई गवई उपस्थित होत्या. त्यांनी यावेळी रक्तदान करणाऱ्या वकीलांचे अभिनंदन केले. या प्रसंगी विलास इंगोले, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, विद्यापीठाचे अधिष्ठाता ए. टी. देशमुख, विभागीय आयुक्त श्वेता सिघल, आणि मनपा आयुक्त सौम्या चांडक उपस्थित होते. शिबीराच्या यशस्वीतेकरीता रक्तदान शिबीर समितीचे अमरावतीचे व महेंद्र भुतडा, अजय दातेराव,सह मान्यवर मंडळी उपस्थित होती.

# अमडापूर पोलिसांच्या मदतीने राजापेठ पोलिसांची कारवाई

## ३.५८ लाखांची रोकड पळविणाऱ्या ट्रकचालकाला पकडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**

तेलंगणा राज्यातून वसुली करून आणलेली ट्रक चालकाकडील ३.५८ लाखांची रोकड पळविणाऱ्या सहकारी सहायक ट्रक चालकाला स्थानिक राजापेठ पोलिसांनी अमडापूर पोलिसांच्या मदतीने अटक केली. शेख रिजवान शेख उस्मान (वय ४०, रा. शिरजगाव कसबा), असे आरोपीचे नाव आहे. पोलीस माहितीनुसार, एका ट्रकचालकाला १४ जून रोजी सायंकाळी अचलपूरहून अदिलाबाद येथे कांदा घेऊन जायचे होते. लांबचा प्रवास



असल्याने त्याने आणखी एक सहकारी चालक म्हणून शेखरिजवान शेख उस्मान याला सोबत घेतले. ११ टन कांदा घेऊन ते अदिलाबाद येथे रवाना झाले. अदिलाबाद येथून मालाच्या विक्रीचे आणि यापूर्वीची थकीत रकमेचे एकुण ३ लाख ५८ हजार रूपये रोख स्वरुपात घेऊन तेथून ते परतीला निघाले. दरम्यान दि.१६ जून रोजी त्यांनी अमरावतीला आणावयाचासरकारी माल ट्रकमध्ये लादला. दोन्ही चालक ट्रक घेऊन १७ जून रोजी पहाटे ४ वाजता अमरावती एमआयडीसीतील राजस्थान मार्बलजवळ पोहोचले होते. व्यापाऱ्याला देण्यासाठी आणलेली रक्कम ट्रकमधील टुल बॉक्समध्ये एका पिशवित ठेऊन मूळ चालक आरोपी रिझवान याला गाडीकडे लक्ष ठेवण्यास सांगून स्वच्छतेसाठी गेला. सुमारे १५ मिनिटांनंतर परतल्या वर मूळ चालकाला सहकारी चालक शैख रिझवान उपस्थितं नव्हता. त्याला मोबाईलवर संपर्क केला असता भ्रमणध्वनी बंद होता. टुल बॉक्समधील रोखड बेपत्ता होती. त्यावरून चालकाने शेख रिजवान शेख उस्मान याच्याविरुद्ध दाखल केलेल्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसानी गुन्हा नोंदवून त्याचा शोध सुरू केला.

# एमआयडीसीच्या विरोधात अन्यायग्रस्त शेतकऱ्याचा उपोषणाचा इशारा

## कृषी दिनापासून ज्ञानेश्वर बारस्कर करणार आमरण उपोषण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नांदगाव पेठ –**

नांदगाव पेठ येथील शेतकरी ज्ञानेश्वर बारस्कर हे गेल्या नऊ वर्षांपासून शेतीच्या नुकसान भरपाईसाठी लढा देत आहेत. परंतु प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे अद्याप त्यांना न्याय मिळालेला नाही. त्यामुळे आता त्यांनी कृषी दिनी म्हणजेच १ जुलै २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला आहे. बारस्कर यांच्या शेतात एमआयडीसी मधून निघणारे दूषित सांडपाणी शिरल्यामुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले. २०१६ पासून त्यांनी विविध शासकीय कार्यालये, मंत्री व आमदार यांच्याकडे न्यायासाठी धाव घेतली. परंतु कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे ते आजही नुकसान भरपाईपासून वंचित आहेत. औद्योगिक विकास महामंडळ, अमरावती यांनी जिल्हा कृषी अधीक्षकांकडून



बारस्कर यांच्या शेताचे पुनर्मूल्यांकन करून अहवाल मागविला होता. मात्र अहवाल सादर होऊनही अद्याप नुकसान भरपाईचा मोबदला न मिळाल्यामुळे बारस्कर यांनी ३० जूनपर्यंत नुकसान भरपाई देण्यात यावी, अन्यथा १ जुलैपासून उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. विशेष बाब म्हणजे ज्ञानेश्वर बारस्कर हे अर्धांगवायूने ग्रस्त असूनही आपल्या हक्कासाठी त्यांनी हा संघर्ष सुरू ठेवला आहे. त्यांच्या जीवितास काही धोका निर्माण झाल्यास याला संपूर्णपणे शासन जबाबदार राहील, असेही त्यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे

# फिन्ले मिल प्रशासनाने कच्चा माल काढला आता विक्रीला

## आ.प्रवीण तायडे यांच्या पाठपुराव्याला यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अचलपूर**

येथील फिन्ले मिलमधील कामगारांच्या थांबलेल्या वेतनासाठी आ. प्रवीण तायडे यांनी केलेल्या आंदोलना दरम्यान फिन्ले मिल प्रशासनाने कच्चा माल विक्री व अन्य उपाययोजना करून वेतन तत्काळ करण्याबाबत आश्वासित केले होते. आ. तायडे यांनी सतत पाठपुरावा केल्याने त्याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत.

गुरुवार, १९ जून रोजी फिन्ले मिलमध्ये कच्चा माल घेण्यासाठी आलेले मालवाहू ट्रक भरून धागा घेऊन जाताना दिसले. त्यामुळे मिल कामगारांच्या वेतनाची रक्कम तत्काळ मिळण्याची आशा पल्लवीत झाली आहे. गेल्या काही महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने चिंतेत असलेल्या फिन्ले मिल कामगारांनी चिमणीवर चढून शोले स्टाईल आंदोलन सुरू केले होते. त्याचा सकारात्मक परिणाम दिसत आहे. आता काही प्रमाणात हालचाली सुरू झाल्याआहेत. आज झालेल्या हालचाली दरम्यान गिरणी कामगार संघटनेचे पदाधिकारी आणि काही सदस्य उपस्थित होते.

प्राप्त माहितीनुसार, एनटीसीकडून तीन गिरण्या पुन्हा सुरू करण्याबाबत केंद्र सरकार विचाराधीन आहे, अशी माहितीही समोर येत आहे. या प्रक्रियेस गती देण्यासाठी आ. तायडे, कुंदन यादव, रूपेश ढेपे, राजा ठाकूर, मनोज सूर्यवंशी, निकेश उघडे, दिनेश उघडे, गिरणी कामगार संघटनेचे



पदाधिकारी व कामगार सातत्याने प्रयत्नशील असून, त्यांनी विविध पातळ्यांवर पाठपुरावा सुरू ठेवला आहे.या हालचालींमुळे फिनले मिलच्या कामगारांमध्ये नवचैतन्य आणि आशावाद निर्माण झाला आहे. पुन्हा एकदा रोजगार सुरू होण्याची शक्यता असल्यामुळे कामगारांच्या चेहऱ्यावर आनंदाचे आणि समाधानाचे भाव स्पष्टपणे दिसून येत आहेत. फिन्ले मिल सुरू करण्याच्या दिशेने सुरू झालेल्या या हालचालींवर आता संपूर्ण शहराचे लक्ष केंद्रित झाले आहे.

# शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्याचा प्रयत्नः औषधी व सुगंधी वनस्पतीसाठी अनुदान अर्ज स्वीकारण्यास प्रारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अकोला**

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्याचा प्रयत्न करण्यात येत असून, आता या अभियानात औषधी व सुगंधी वनस्पतीचा समावेश करण्यात आला आहे. शेतकऱ्यांकडून अनुदानासाठी अर्ज स्वीकारण्यास सुरुवात झाली आहे.

शेतीला आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरण्यासाठी पूरक व्यवसाय करण्याची आवश्यकता आहे. फलोत्पादन हा शेतीला अधिक मूल्यवर्धन ठरणारा व्यवसाय ठरु शकतो. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध योजना राबवण्यात येतात. या अंतर्गतच फलोत्पादन पिकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान काढणीत्तोर व्यवस्थापन घटकांतर्गत एकात्मिक पॅक हाऊस, पूर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर व एकात्मिक शीतसाखळी प्रकल्पांच्या उभारणीसाठी शासनाकडून अर्थसाहाय्य देण्यात येते. फलोत्पादन पिकांचे मूल्यवर्धन, प्रक्रिया करून शीतगृहांमध्ये साठवणूक करून फलोत्पादन पीके, त्यांचे



पदार्थ वर्षभर सर्व हंगामात उपलब्ध होऊ शकतात त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होण्यास मदत होणार आहे. दरम्यान यंदाही या अनुषंगाने अर्जाची प्रक्रिया सुरू झाली आहे. क्षेत्र विस्तारासाठी हा कार्यक्रम राबवला जातो. त्याचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर फलोत्पादन घटकाखाली अर्ज करावेत. योजनेचा अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी केले आहे.महाग वनस्पतीसाठी अनुदानाची तरतूद एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानात अन्य सुंगधी वनस्पतींचाही समावेश करण्यात आला आहे. गुलाब, रोझमेरी, निशिगंध, जिरेनियम, कॅमोमाईल, चंदन, दवणा, जाई, लॅव्हेंडर यासारख्या महागड्या सुगंधी वनस्पतींची लागवड करण्यासाठी देखील अनुदान उपलब्ध आहे. प्रतिहेक्टरी १ लाख २५ हजार रुपये याप्रमाणे मापदंड असून, सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४० टक्के, अधिसूचित क्षेत्रांसाठी ५० टक्के अर्थसहाय्य, लागवड साहित्य दोन हेक्टर मर्यादेत देण्या येणार आहे.

### असे मिळेल अनुदान :

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानात अनुदानासाठी शेतकरी ज्येष्ठमध, मुलेठी, शतावरी, कलिहारी, सफेद मुसळी, गुग्गूळ, मंजिष्ठा, कुटकी, अतिस, जटामासी, अश्वगंधा, ब्राम्ही, तुलसी, विदारीकंद, पिंपळी, चिराटा, पुष्करमूळ आदी औषधी वनस्पतींची लागवड करू शकतात. लागवडीचा मापदंड प्रतिहेक्टरी दीड लाख रुपये आहे. सर्वसाधारण क्षेत्रासाठी ४० टक्के आणि अधिसूचित क्षेत्रांसाठी ५० टक्के अर्थसाह्य, लागवड साहित्य मिळते. जास्तीत जास्त २ हेक्टर क्षेत्रासाठी अनुदान मंजूर होणार आहे.

# गुन्हे शाखेचे पोलिस असल्याची बतावणी करून २ लाखांचे सोने लंपास

## त्या घटनेचा राजस्थानी मंडळातर्फे निषेध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मोर्शी** – गुन्हे शाखेचे पोलिस असल्याची बतावणी करून दोन चोरट्यांनी शहरातील श्यामसुंदर राधाकिसन बंग यांची सोन्याची अंगठी व गोफ असा दोन लाखांचा ऐवज १८ जून रोजी चोरून नेला.

या घटनेचा निषेध व ताबडतोब छडा लावावा या मागणीसाठी मोर्शी येथील राजस्थानी मंडळातर्फे पोलिस निरीक्षक नितीन देशमुख यांना शुक्रवार, २० रोजी निवेदन देण्यात आले. श्यामसुंदर बंग यांच्या घराजवळ दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी आपण गुन्हे शाखेचे पोलिस असून, शहरात चोऱ्यांचे प्रमाण खूप वाढलेले आहे. त्यामुळे तुमच्याकडील सोने सुरक्षित ठेवा. तुम्ही अंगावर सोने घालून फिरू नका ते काढा व खिशात ठेवा, अशी बतावणी करून बंग यांच्या गळ्यातील सोन्याची साखळी व अंगठी काढायला लावली.

नंतर तेथून हातचलाखी करून पळ काढला. यात बंग यांचे दोन लाखाचे आर्थिक नुकसान झाले.

या घटनेविरोधात शहरातील राजस्थानी समाजाच्या वतीने मोर्शीच्या पोलिस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले. तसेच या घटनेचा निषेध करत चोरट्यांचा लवकरात लवकर शोध घ्यावा.




मोर्शी शहर हे सुरक्षित शहर असून या शहराची ही ओळख कायम रहावी म्हणून अशा घटना पुन्हा घडू नयेत याकरिता उपाययोजना कराव्यात अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

याप्रसंगी श्यामसुंदर बंग, राधेश्याम राठी, दिलीप अग्रवाल, डॉ. संतोष राठी, डॉ. श्यामसुंदर राठी, राजेश राठी, गोविंद राठी, निखिल ओझा, प्रणव राठी तसेच शहरातील राजस्थानी समाजातील इतर मान्यवर उपस्थित होते.

# कंत्राटदाराने मुख्य रस्त्यावर शहरातील कचरा, मेलेली जनावरे आणून टाकल्याने नागरिकांचा प्रशासनाविरोधात संताप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अंजनगाव सुर्जी**

नगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे प्रताप दिवसेंदिवस वाढत चालले असून, अनियमितता व गोंधळ असणाऱ्या आरोग्य विभागाने शहरातील नागरिकांकडून गोळा झालेला घनकचरा काहीही घेणे देणे नसताना गावाच्या हद्दीत व परिसरातील रस्त्यावर टाकून ग्रामीण भागातील नागरिकांनाही आरोग्य विभागाने वेठीस धरल्याचा प्रकार समोर आला आहे. यासंदर्भात शुक्रवारी शिरजगाव (शेरकर) येथील नागरिकांनी कचऱ्याच्या घंटागाड्या परत पाठवून अंजनगाव सुर्जी नगर पालिकेविरोधात दंड थोपटल्याचे बघायला मिळाले.

अंजनगाव सुर्जी नगर परिषदेंतर्गत गोळा होणारा कचरा गेल्या काही दिवसांपर्यंत अंजनगाव-अकोट रोडवरील कचरा डेपोवर टाकण्यात येत होता. परंतु, या कचरा डेपोत कचऱ्यावर कोणतीही प्रक्रिया करण्याची व्यवस्था नसल्याने कचऱ्याचा एक कृत्रिम पहाड या महामार्गावर तयार झाला होता. त्यामुळे कचरा उचलण्याचा



कंत्राट असलेल्या कंत्राटदारांनी अंजनगाव शिरजगाव रस्त्याच्या मध्ये असलेल्या नगर परिषदेच्याच जागेवर जेथे पालिकेचा फक्त बाजारातील ओला कचरा आणण्याची परवानगी आहे, तेथे गेल्या एक- दोन महिन्यांपासून घनकचरा टाकणे सुरू केले. उन्हाळ्यात या कचऱ्याला लागलेल्या आगीच्या धुराने व दुर्गंधीमुळे शिरजगाव येथील नागरिकांना जगणे मुश्कील झाले होते. कचऱ्यातील सिंगल युज प्लास्टिक शेतात जमा होत असल्याने परिसरातील शेतकरी धास्तावले आहेत. आता भर पावसाळ्यात नगर परिषदेच्या कंत्राटदाराने मुख्य रस्त्यावर शहरातील कचरा, मेलेली जनावरे आणून टाकल्याने नागरिकांना रस्त्यावरून ये जा करणे कठीण झाले आहे. रस्त्यावर आलेल्या कचऱ्यामुळे तसेच कचरा घेऊन येणाऱ्या सुसाट घंटागाड्यांमुळे अपघाताचेही प्रमाण वाढले आहे. त्यामुळे शिरजगाव येथील नागरिकांनी एकत्र येत पालिका प्रशासनाला जाब विचारला. कचरा घेऊन आलेल्या घंटागाड्या परत पाठवल्या. कंत्राटदाराने कचरा व्यवस्थापना संदर्भातील नियम व अटीचे उल्लंघन केल्याने त्याच्यावर कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी शिरजगाव येथील जवळपास सर्वच नागरिक नगर पालिकेत पोहचत निषेध व्यक्त केला. कचरा बंद होत नाही तोपर्यंत गाड्या येऊ देणार नाही कचऱ्यासंदर्भात त्रस्त नागरिकांनी आमदार व खासदारांशी दूरध्वनीवरून संपर्क केला असता या बाबत मुख्याधिकाऱ्यांशी बोलून तोडगा काढतो, असे सांगण्यात आले. परंतु नागरिकांनी जोपर्यंत आमच्या परिसरात घनकचरा टाकणे बंद होत नाही, नगर परिषद तसे लेखी देत नाही, तोपर्यंत रस्त्यावरील कचरा उचलू देणार नाही. आलेल्या कचऱ्याच्या गाड्या खाली होऊ देणार नाही अशी भूमिका शिरजगाववासीयांनी घेतली आहे.

# शहरासह जिल्ह्यात व्हायरल फीव्हरच्या रुग्णसंख्येत वाढ;ओपीडीत ४०० रुग्ण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

अमरावती मागील चार दिवसांपासून होत असलेल्या पावसामुळे अमरावतीकर सुखावले असले, तरी वातावरणातील बदलामुळे मात्र अनेक आजारांनाही निमंत्रण मिळणार आहे. परंतु यासाठी जिल्हा आरोग्य यंत्रणा सज्ज झाली आहे. व्हायरल फिव्हर, सर्दी-खोकला, उलटी-जुलाब या संभाव्य आजारांची बाधा झालेल्या रुग्णांसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय संलग्न उपजिल्हा रुग्णालयाचा बाह्य रुग्ण विभाग अधिक सतर्क ठेवण्यात येणार आहे. मागील दोन दिवसांत जिल्ह्यातील सर्व रुग्णालयात ३०० ते ४०० रुग्णांची ओपीडीमध्ये भर पडली आहे. तसेच सामान्य वॉर्डासह लहान मुलांचे वॉर्ड तयार ठेवले आहेत, अशी माहिती जिल्हा सामान्य रुग्णालयाने दिली. वातावरणात बदल झाल्यास आजारपण आणि थकवा वाढतो. सध्या वातावरणात झालेला बदल त्रासदायक ठरू शकतो. उन्हाळ्यात पाऊस पडल्यास सर्दी, खोकला यासारखे संसर्गजन्य आजार बळावतात. या बदलत्या वातावरणाचा त्रास लहान मुलांना जास्त होऊ शकतो. ते पावसात भिजणार नाहीत, याची काळजी घ्यावी. मध्यंतरी अवकाळी पावसाने तापमानावर परिणाम झाला. अचानक बदललेल्या वातावरणात नागरिकांना सर्दी, खोकल्याचा त्रास सहन करावा लागत आहे. काही दिवसांत साथजन्य आजाराचे रुग्ण वाढण्याची शक्यता शहरातील वैद्यकीय तज्ज्ञांनी वर्तवली आहे. गेल्या काही दिवसांपासून वातावरणात बदल होत आहे. सतत होत असलेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाल्याने काही आजारांना पोषक वातावरण मिळणार आहे. त्यामुळे संसर्ग आणखी वाढण्याचा धोका आहे. नागरिकांनी घाबरून न जाता अधिक सजग राहण्याचे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे यांनी केले आहे.



# विदर्भ मिल चौकात रस्ते दुभाजकामुळे कारचा अपघात

## सुदैवाने जीवितहानी नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

शहरातील रोडवरील विदर्भ मिलचौकात रात्रीच्या वेळी वाहनधारकांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या दुभाजकामुळे वाहनचालकांच्या जीवावर बेतण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कारण, या ठिकाणी पथदिवे बंद असून गतिरोधकही नाहीत. त्यामुळे समोर चौक असल्याचे स्पष्ट दिसत नसल्याने अनेकवेळा छोटे मोठे अपघात घडत आहेत. अनेकदा वाहने थेट दुभाजकावर चढल्याच्या सुदैवाने जिवितहानी झाली नाही. दि. १८ जून रोजी रात्रीच्या सुमारास एक चारचाकी थेट दुभाजकावर चढली होती. मात्र या अपघातील चालक महिलेला कोणतीही दुखापत झाली नसल्याचे प्रत्यक्षदर्शींनी



सांगितले.मागील काही दिवसांत अपघाताच्या तीन घटना घडल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. या मार्गावर पथदिवे नसल्याने रात्रीच्या वेळी काळोख पसरतो. या महामार्गावरील पथदिवे बंद असून याकडे स्थानिक प्रशासनाला लक्ष देण्यासाठी वेळ नाही. यासोबतच, चौकाजवळ कोणत्याही प्रकारचा चेतावणी फलक, रेडियम पट्टी अथवा वेगमर्यादा नियंत्रक गतिरोधक देखील नाही. त्यामुळे वाहनचालकांना अंदाज न आल्याने थेट दुभाजकावर वाहन आदळले आहेत.

या रस्त्यावर मागील काही दिवसांपासून किरकोळ व्यापाऱ्यांनी अतिक्रमण केल्याने वाहतुकीसाठी अडथळ ठरत आहेत. नुकत्याच घडलेल्या एका घटनेत एक चारचाकी वाहन थेट दुभाजकावर चढले. सुदैवाने जीवितहानी झाली नाही, मात्र वाहनाचे मोठे नुकसान झाले. या मार्गावर वाहतूक मोठ्या प्रमाणात असल्याने रात्रीच्या वेळी होणाऱ्या अपघातात वाढ झाली आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. प्रशासनाने कोणाच्या जीविताशी खेळू नये, हा प्रश्न गंभीर असून मार्गी न लावण्यास नागरिकांच्या रोषाचा सामना करावा लागेल, असा इशाराही या वेळी देण्यात आला आहे.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये ‘अकरावा जागतिक योग दिन’ उत्साहात साजरा

## एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग या थीमवर आधारित भव्य योग कार्यक्रमाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

अकरावा जागतिक योग दिन २१ जून २०२५ रोजी संपूर्ण जगभर साजरा करण्यात आला. याच पार्श्वभूमीवर पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती तर्फे एक भव्य आणि शिस्तबद्ध योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संस्थेच्या स्वामी विवेकानंद ऑडिटोरियममध्ये पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, पी. आर. पोटे पाटील मेडिकल सायन्स आयुर्वेद महाविद्यालय, पी. आर. पोटे पाटील फार्मसी महाविद्यालय , पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, पी. आर. पोटे पाटील आर्किटेक्चर महाविद्यालय, पी. आर. पोटे पाटील बीएड महाविद्यालय, पी. आर. पोटे पाटील नर्सिंग महाविद्यालय, पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कुल, पी.



आर. पोटे पाटील ज्युनिअर विद्यालय अश्या विविध अभ्यासक्रमात शिकणारे एकूण ४१०० विद्यार्थी सामूहिकरित्या सहभागी होऊन योगाभ्यास केला.

Yoga for One Earth, One Health - एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग ही यंदाच्या जागतिक योग दिनाची संकल्पना असून, पृथ्वीवरील प्रत्येक व्यक्तीचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहावे, या हेतूने योगाभ्यासाला प्रोत्साहन देणे, हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता धन्वंतरी मंत्रोच्चार व प्रार्थनेने झाली. अनुभवी योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार, प्राणायाम, ताडासन, भुजंगासन, वज्रासन, वृक्षासन, अनुलोम-विलोम यांसारख्या योग क्रिया सखोल आणि शिस्तबद्ध पद्धतीने केल्या. त्याचप्रमाणे विविध प्रात्यक्षिक पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालय च्या विद्यार्थ्यांनी यावेळी साजरी केली. सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी योगाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

कार्यक्रमास विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षकवृंद , शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान परिसरात सकारात्मक ऊर्जा, उत्साह व शिस्तीचे वातावरण पाहायला मिळाले.

या कार्यक्रमाचे आयोजन पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप च्या वतीने करण्यात आले महाविद्यालयातील सर्व विभाग, स्वयंसेवक, शिक्षकवर्ग व कर्मचाऱ्यांचे विशेष योगदान लाभले. विद्यार्थ्यांनी देखील योगाबद्दल जाणून घेण्यास व तो आपल्या दैनंदिन जीवनात आत्मसात करण्याचा निर्धार व्यक्त केला.

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपने योग या भारतीय जीवनशैलीच्या महत्त्वपूर्ण अंगाला केंद्रस्थानी ठेवून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यप्रेम, मानसिक शांती आणि सकारात्मक विचारसरणी रुजवण्याचा अत्यंत स्तुत्य उपक्रम राबवला आला.

# डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे ‘आंतरराष्ट्रीय योग दिन’ साजरा

## योग साधना प्रत्येकाची दिनचर्या असावी – अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी दिनांक २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याबाबत सुचित केले होते. त्याअनुषंगाने श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाची जनरल सेक्रेटरी वैदेही विनय काळे व विद्यार्थी अभिनंदन शेंडे यांनी उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांसमोर योग प्रात्यक्षिके सादर केली व त्यानुसार सर्व उपस्थितांनी त्याचे अनुपालन केले. यावेळी अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांनी योगाचे महत्व विषद करतांना सांगितले की 'योग' शब्दाचा अर्थ जोडणे, बांधणे, एकत्र आणणे असा होतो. योगाच्या माध्यमातून शरीराच्या उत्तम आरोग्या बरोबरच मनाचे आरोग्य आणि आध्यात्मीक प्रगती होते. योग साधना प्रत्येकाची दिनचर्या असावी. योग दिनाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पुजन, हारार्पण व दिपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विद्यार्थीनी मनस्वी आसरे हिने केले.

कार्यक्रमाला रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. वसंत लुंगे, डॉ. प्रमोद भिसे, डॉ. गणेश पुंडकर, डॉ. रामावतार सोनी, डॉ. संध्या कोठारी, डॉ. सुषमा पांडे, डॉ. सुरेखा तायडे, डॉ. दिपाली विधळे, डॉ. स्वप्नील मोहोड, डॉ. गितांजली यादगीरे, क्रिडा शिक्षक संजय वाटाणे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केंद्रीय संचार ब्युरो अमरावती तर्फे ११ वा अंतरराष्ट्रीय योग दिवस कार्यक्रमाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

११ व्या अंतरराष्ट्रीय योग दिवस २०२५ च्या निमित्ताने माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय, अमरावती आणि शिवाजी आइडियल इंग्लिश स्कूल तसेच शिवाजी बहुउद्देशीय उच्च माध्यमिक शाळा, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २१ जून २०२५ रोजी शाळेच्या मैदानात योगाभ्यास घेण्यात आल्या.२१ जूनला अंतरराष्ट्रीय योग दिवस २०२५ कार्यक्रमामध्ये योगाचार्य श्री रवींद्र जोन्धळेकर, यांच्या प्रमुख उपस्थितीत योग साधना आणि मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. योग साधनेमुळे शारीरिक तसेच मानसिक तंदुरुस्ती मिळते जे आपल्या निरोगी आयुष्यासाठी आवश्यक आहे. त्यामुळे आपण सर्वांनी दररोज योग अभ्यास करावा असे प्रतिपादन केंद्रीय संचार ब्युरोचे सहायक माहिती अधिकारी श्री शशिकांत पटेल यांनी केले. यावेळी श्री. प्रसाद देशमुख, मुख्याध्यापक शिवाजी बहुउद्देशीय उच्च माध्यमिक शाळा, अमरावती, सौ. वैशाली ठाकरे, मुख्याध्यापिका, शिवाजी



आयडियल इंग्लिश स्कूल, अमरावती, श्री नरेशचंद्र पाटील, सदस्य, शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती तसेच ३ महाराष्ट्र सिग्नल कंपनी एनसीसी, अमरावती चे सीओ रविकांत सिंग भदोरिया यांच्या मार्गदर्शनात एनसीसी चे सुभेदार मेजर दामोदर सर, पवन जैस्वाल, पवन राठी, प्रशांत इंगोले आणि एनसीसी चे सर्व विद्यार्थी हे सर्व प्रामुख्याने उपस्थित होते. केंद्रीय संचार ब्युरोचे सहायक माहिती अधिकारी श्री शशिकांत पटेल अणि यांनी उपस्थित योग साधकांना ११ व्या अंतरराष्ट्रीय योग दिवस २०२५ चे महत्व तसेच योग साधनेचे फायदे याबद्दल मार्गदर्शन केले. योगाभ्यास मध्ये केंद्रीय संचार ब्युरो तर्फे सर्व साधकांना यावेळी प्रमाणपत्राचे अणि अल्पोपहार वितरण करण्यात आले. यावेळी योग माधिका कु. आस्था जोन्धळेकर हिने आपल्या अतिशय रोमांचक योग प्रात्यक्षिकाद्वारे सर्वांचे लक्ष वेधून घेतले,कार्यक्रमाला यशस्वीरित्या पार पाडण्यात अमर खंडारे सर आणि शारदा फुले, पर्यवेक्षिका, शिवाजी आयडियल इंग्लिश स्कूल, शिवाजी उच्च माध्यमिक शाळेचे संदीप इंगोले व इतर कर्मचारी आणि केंद्रीय संचार ब्युरोचे सागर लाडोळे यांचे सहकार्य लाभले.

# खरे लाभार्थी डावलून श्रीमंतांना घरकुलाचे वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१तळेगाव दशासर**

तळेगाव दशासर ग्रामपंचायतमधील घरकुल धारकांना न्याय मिळण्यासाठी मे महिन्यात आमसभा घेण्यात आली, तसेच काही लाभार्थ्यांनी आमरण उपोषणसुध्दा केले होते. खऱ्या लाभार्थ्यांना डावलून श्रीमंतांनाच घरकुलाचे वाटप झाल्यामुळे येथील गरजू लाभार्थी योजनेपासून वंचित आहेत.तळेगाव दशासर येथील गरजू व पात्र लाभार्थ्यांचे म्हणणे आहे की, येथील ग्रा. पं. ने घरकुल वाटपात भ्रष्टाचार केला आहे. गरजूऐवजी श्रीमंत लोकांनाच घरकुलाचे वाटप केले आहे. ज्यांच्याकडे सिमेंट काँक्रीटचेतीन मजली मकान आहे त्यांना घरकुलाचा लाभ दिला आहे, घरकुल ही योजना ग्रामपंचायत, पंचायतसमिती, जिल्हापरिषद व डीआरडीएमार्फत छाननी करून योग्य त्या लाभार्थ्याला घरकुल दिल्या जाते. तरीही काही लोकांनी वशिलेबाजीने चिरीमिरी देऊन आपले घरकुल मंजूर करून घेतले आहे, असा आरोप आहे.नुकतेच घरकुलासाठीच आमरण उपोषणसुध्दा करण्यात आले होते. उपोषणकर्त्यांनी घरकुल वाटपात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची मागणी केली होती.

# स्व.दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयात सामूहिक योग दिन साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नांदगाव पेठ**

२१ जून २०२५ रोजी यावर्षीचा अकरावा जागतिक योग दिन म्हणून स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय नांदगाव पेठ येथे शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने मोठ्या प्रमाणात सार्वत्रिक सामूहिक एक दिवसीय योग साधना शिबिर म्हणून साजरा करण्यात आला. या जागतिक योग दिनानिमित्त महाविद्यालयातर्फे परिसरात राहत असलेल्या नागरिकांना व महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनींना आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी भव्य योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील शारीरिक संचालक प्रा डॉ. श्रीकांत माहुलकर व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पी. आर. जाधव यांनी सकाळी सहा वाजता महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्ताने योग साधना प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे यांनी आरोग्य आणि आत्मिक समृद्धीसाठी एक पाऊल या विषयावर मार्गदर्शन



करताना म्हणाले यंदा २१ जून २०२५ रोजी अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा केल्या जात आहे. भारताची ही अमूल्य देणगी मानवाच्या समग्र जीवनशैलीला जागतिक उत्सव ठरली आहे. आज समाजामध्ये आभालवृद्धापासून अनेक जण अनेक शारीरिक आजाराने त्रासाने हैराण झालेले आहेत. त्या आजारावर रामबाण औषध म्हणजे योग साधना ही अत्यंत महत्त्वाची आहे. माणसाच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे योग साधना आपल्या विस्मरणात गेलेली आहे. परंतु देशातील सर्व नागरिकांनी योग साधना आत्मसात जर केली तर जीवनातील अनेक समस्यावर प्रत्येक व्यक्तीला जीवनाचा आनंद घेता येईल व आपला आरोग्यावर होणारा खर्च टाळता येईल असे ते म्हणाले.याप्रसंगी सातारा येथील योग प्रशिक्षक श्री. दत्तात्रेय घाडगे म्हणाले योगाभ्यास म्हणजे फक्त आसने नाही किंवा शारीरिक व्यायाम नाही तर तो आपल्या आरोग्याचा, मन:शांतीचा आणि आत्मिक समृद्धीचा मार्ग आहे. या दशकपूर्तीच्या ऐतिहासिक प्रसंगी प्रत्येक घरात, प्रत्येक मनात योगाभ्यास रुजवायचा संकल्प करूया. आपल्या भागातील परिसरातील आयोजित होणाऱ्या योग्य संगमात सहभागी व्हा. आपल्या कुटुंबाला, शेजाऱ्याला, मित्रमंडळींना सोबत घेण्याचा संकल्प करा असे ते म्हणाले.

या आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या निमित्ताने महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रा. डॉ. राजेश ब्राह्मणे, प्रा. डॉ .सुनिता बाळापुरे, प्रा. डॉ.गोविंद तिरमनवार, प्रा. डॉ. सुभाष पवार, प्रा. डॉ. विकास अडलोक, प्रा. डॉ. पंकज मोरे, शिक्षकेतर कर्मचारी सौ. रेखाताई पुसदकर, श्री. राहुल पांडे, श्री. दिलीप पारवे, श्री. विनायक पावडे, श्री. अनिल शेवतकर, श्री. छेदिलाल कोठार, माजी विद्यार्थी संघटनेचे श्री. स्वप्निल देशमुख, श्री. राजेश इंगोले, अमरावती तालुक्याचे भाजपा ग्रामीण विभागाचे सरचिटणीस श्री. अमोल व्यवहारे, श्री. सचिन इंगळे, श्री. अनुप भगत आणि महाविद्यालयातील परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, डॉक्टर, वकील, शिक्षक, समाजसेवक, राजकीय पदाधिकारी, पत्रकार, शेतकरी, शेतमजूर, पालक, विद्यार्थी- विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या साधनेचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.


# पोरगव्हाणच्या दोन युवकांचा कोंढाळीनजीक अपघाती मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१वरुड**

वरुड तालुक्यातील पोरगव्हाण येथील दोन युवक दुचाकीने कोंढाळी रस्त्याने जात असताना घाट रस्त्याने अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत दुचाकी सुरक्षा भिंतीवर आदळली. यामध्ये दुचाकीवरील दोघांचा घटनास्थळी मृत्यू झाल्याची घटना २० जूनरोजी शुक्रवारी घडली.

मंगेश शंकरराठ खोडे (२७), पवन सुनील शेबेकर (२३) दोघेही रा. पोरगव्हाण अशी मृतकांची नावे आहेत, तर गौतम श्रवण बागडे (२४) आकाश वासुदेव जवणे (२२) अशी अपघातात जखमीची नावे आहेत कोढाळी - काटोल रोडवरील चक्रीघाटात अज्ञात वाहनाने धडक दिली. या विचित्र अपघातात मंगेश खोडे उपवन शेबेकर या दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले.मंगेश शंकर खाडे हे नागपूर येथे स्टार बसवर चालकपदावर आहे.

ते शुक्रवारीसकाळी गावातील पवन सुनील शेवेकर यास त्याच्या




हिरोहोडा स्लेंडर गाडी न एम एच २७ सीएन६४३७ ने काटोलवरून कोढाळीकडे नेत असताना कोंढाळीजठळील चक्रीपाटात विरुद्ध दिशेने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या घटनेत त्यांची दुचाकी सुरक्षा भिंतीवर आदळून दोघांनाही डोक्यास जबर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झालायाच गाडीच्या मागे जलालखेडा येथील काही मित्र बाजारगाव येथील फन अॅण्ड फूड येथे पिकनिकसाठी जात होते. त्यामध्ये आकाश वासुदेव जवणे (२२) व गौतम श्रावण बागडे (२४), हे त्यांची दुचाकी क्र. एम एच ३१एसस ६१३७ नी मागून येत होते. त्याच क्षणी पवनची दुचाकी त्यांच्या गाडीवर आदळली. यामध्ये ते दोघेही गंभीर जखमी झाले. त्यांच्या सोबतचे मित्र भूषण बडिये. आकाश टेकाडे हे समोर आले होते. मित्र का आले नाही म्हणून परत पाहायला गेले असता त्यांना अपघात दिसला. लगेच कोंढाळी पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताय पोलिस अधिकारी पीएसआय सलीम शेख स्टाफसह घटनास्थळी जाऊन जखमीना कोंढाळी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे आणले. येथे वैद्यकीय अधिकारी डॉ पूजा मंजूळकर यांनी प्रथमोपचार करून नागपूरला विशेष उपचारासाठी पाठविले, तर मृतकांच्या परिवारास माहिती देऊन दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी काटोल रुग्णालय पाठविण्यात आले असून कोंढाळीचे ठाणेदार राजकुमार त्रिपाठी व पीएसआय धवल देशमुख अज्ञात वाहनाचा शोध घेत आहेत.

# शहरी आरोग्य केंद्राची कुष्ठरोग सर्वेक्षण मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २१ अमरावती**

शहरी आरोग्य केंद्र, भाजीबाजार अंतर्गत गांधी आश्रम, आनंद नगर, महाजनपुरा, माताखिड़की या परिसरामध्ये दोन दिवस विशेष कुष्ठरोग सर्वेक्षण मोहीम राबविण्यात आली. सदर परिसरातील नागरिकांची शारिरिक तपासणी करण्यात आली व आजाराविषयी संपूर्ण माहिती देण्यात आली, तसेच रुग्णांची तपासणी करण्यात आली. यावेळी शहरी आरोग्य केंद्र, भाजीबाजार येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋतुजा सुरंजे, कुष्ठरोग विभाग (प. ना. कु. प.) येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. विनंती नवरे, आरोग्य वर्धिनी आनंद नगर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवानी शिंदे यांनी मार्गदर्शन केले. सदर सर्वेक्षण करिता शहरी आरोग्य केंद्र, भाजीबाजार येथील संपूर्ण आशावर्कर यांनी सहभागी होऊन संपूर्ण नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली व कुष्ठरोग विषयक माहिती देण्यात आली.यावेळी श्रीमती उमा संजय जाधव, पऱ्हाळे अवैप अमरावती, श्रीमती लिना वानखड़े, शशिकांत जयस्वाल, तसेच कुष्ठरोग विभागातील श्रीमती गावंडे, श्रीमती केने, श्रीमती रामटेके, इंगळे, पिटर, सोनार, धुडे व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# प्रवीण आखरे यांचा तब्बल १ तास २ मिनिटे ११ फूट खोल पाण्यात योगासनाचा अनोखा विक्रम




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१ अमरावती**

अमरावती पोलिस जलतरण केंद्र हे शहरातील पोलिस मुख्यालयाच्या मार्फत चालविली जाते. या केंद्राची जबाबदारी पोलिस कर्मचारी प्रवीण दादाराव आखरे यांच्यावर आहे. ते येथे येणाऱ्या नागरिकांना जलतरणाचे तसेच जलयोगाचे प्रशिक्षण देतात. प्रवीण आखरे यांनी आपल्या योगकौशल्याच्या जोरावर इंडिया बुक ऑफ रेकॉर्डसह एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव नोंदवले आहे. त्यांनी आज ११ फूट खोल पाण्याच्या आत तब्बल १ तास २ मिनिटे कोणतीही हालचाल न करता सावधान स्थितीत राहून अनोखा विक्रम केला. याशिवाय, त्यांनी २२ मिनिटे ५२ सेकंदात पाण्यावर तब्बल ५० योगासने सादर करून स्वतंत्र विक्रम प्रस्थापित केला आहे. जागतिक योग दिनाच्या दिवशी त्यांनी जलतरण केंद्रात योगासने करून योगप्रतीची निष्ठा आणि जनजागृतीचा संदेश दिला.

# खंडवा बस जंगलात बंद पडल्याने प्रवाशांचे हाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१धारणी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचीअमरावती - खंडवा बस अचानक वाघाचे वास्तव्य असणाऱ्या जंगलात बंद झाल्याने प्रवाशांमध्ये भीती निर्माण झाली. घटांग ते सेमाडोहच्या मधात बस बंद पडल्याने प्रवाशांना पुढील प्रवास करण्यासाठी कुठल्याही प्रकारचे पर्यायी व्यवस्था करण्यात आली नाही व कोणी जबाबदार अधिकारी त्या ठिकाणी पोहोचले नाही. त्यामुळे प्रवाशांना जीव मुठीत घेऊन तासन्तास ताटकळत बसावे लागले. यामधे महिला, लहान मुले व वृद्ध प्रवासी प्रवाशांचा समावेश



होता.मेळघाटमध्ये भंगार गाड्या पाठवत असल्याने हा सर्वप्रकार होत आहे. परतवाडा डेपोमध्ये नवीन लालपरी शासनामार्फत पाठविण्यात आले आहे. तरीसुद्धा मेळघाटमध्ये लालपरी आली नसल्याने येथील नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. मेळघाटमध्ये माणसं नसून जनावरे प्रवास करतात काय, असा प्रश्न भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते सदाशिव खडके यांनी केला आहे. एकीकडे या जंगलामध्ये वाघाचा मुक्त संचार सुरू असताना कित्येकांवर वाघाने हल्ला करून तयार करणे अशा जंगलात प्रवाशांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. दररोज मेळघाटमध्ये एक महामंडळची बस बंद पडते. याबाबत बरेचदा परतवाडा आगर व्यवस्थापकाशी स्थानिक नेत्यांनी पाठपुरावा केला. तरीसुध्दा जैसे- थे स्थिती कायम आहे.

# विदर्भ, मराठवाड्यात पावसाची मोठी तूट, शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

मोसमी पावसाने राज्य व्यापल्याची घोषणा भारतीय हवामान खात्याने केली. मात्र, विदर्भासह मराठवाडा आणि खानदेशाकडे मोसमी पावसाचे वारे आले, पण पावसाने पाठ फिरवली. जून महिन्यातील पहिल्या २० दिवसांच्या कालावधीत राज्याच्या या तीनही भागात पावसाची मोठी तूट दिसून आली. विदर्भात ५७ टक्के पावसाची तूट आहे, जी देशात सर्वाधिक आहे. तर मराठवाड्यात ३९ टक्के पावसाची तूट आहे. त्याचा परिणाम या भागातील पेरण्यांवर झाला असून शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट उद्भवले आहे.

मुंबईसह कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात गेल्या दहा दिवसात मूसळधार पाऊस पडला आहे. एवढेच नाही तर राजस्थानचा पूर्व भाग जिथे विदर्भापेक्षा केवळ एक तृतीयांश पाऊस पडतो, तिथे यंदा विदर्भाच्या जवळपास दुप्पट पाऊस झाला आहे. पूर्व राजस्थानात सर्वसाधारण ३०.९ मिलीमीटर पाऊस पडतो आणि यावेळी तिथे ७३.३ मिलीमीटर पाऊस पडला. तर विदर्भात ९३.३ मिलीमीटर पाऊस पडतो आणि तिथे ३९.७ मिलीमीटर पाऊस पडला. विदर्भात बंगालच्या उपसागरावरुन येणाऱ्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे भरपूर पाऊस पडतो, पण यावर्षी अजूनही तशी स्थिती निर्माण झालेली नाही.

मे मध्ये झालेल्या वादळी पावसानंतर आणि मुंबईत झालेल्या पावसानंतर समाजमाध्यमांवर काही स्वघोषित हवामान तज्ज्ञांनी मोसमी पावसाचे अंदाज देण्यास सुरुवात केली. त्याला शेतकरी बळी पडले आणि त्यांनी पेरणीला सुरुवात केली. मराठवाड्यात सुमारे ६० ते ७० टक्के शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या आहेत. तर विदर्भात २० ते ३० टक्के शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या आहेत. मात्र, पावसाअभावी दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर आहे.


# महापालिकेला दरवर्षी १० कोटींचे नुकसान

## १ जानेवारी २०२५ पासून नवा दूरसंचार कायदा लागू अनुदानाच्या स्वरूपात होणार का भरपाई ?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

दूरसंचार क्षेत्रात पायाभूत सुविधांच्या वेगवान प्रसारासाठी खासगी कंपन्यांना भूमिगत केबल आणि मोबाइल टॉवरकरिता युद्धस्तरावर परवानगी मिळणार आहे. मात्र, या केबल व टॉवरकरिता कर आकारता येणार नाही, असे निर्देश नगर विकास विभागाने दिले. त्यामुळे महानगरपालिकेला वर्षाकाठी कररूपाने येऊ शकणाऱ्या १० कोटींच्या उत्पन्नाला मुकावे लागणार आहे.

नगर विकास विभागाच्या आदेशानुसार राज्यात १ जानेवारीपासून शहरी नागरी स्वराज्य संस्थांमध्ये नवा कायदा लागू झाला. आता या कायद्याची स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काटेकोरपणे अंमलबजावणी अनिवार्य आहे. त्यानुसार महानगरपालिका प्रशासनाने अंमलबजावणीस प्रारंभ केला आहे. हा नवा कायदा खासगी मोबाइल कंपन्यांसाठी लाभदायक ठरणारा आहे.आर्थिक डबघाईस आलेल्या महानगरपालिकेला मोबाइल टॉवर आणि भूमिगत केबलवर टॅक्स आकारणीतून दरवर्षी मिळणाऱ्या १० कोटींच्या उत्पन्नाला मुकावे लागणार आहे.



### अर्ज करताच वेळेत मिळेल परवानगी

खासगी मोबाइल कंपन्यांना टॉवर उभारणी आणि भूमिगत केबल टाकण्यासाठी महानगरपालिकेच्या नावे ऑनलाइन अर्ज करावा लागेल. हा ऑनलाइन अर्ज मंजूर करताना आयुक्तांना नियमांची पूर्तता करावी लागणार आहे. त्याकरिता राज्य शासनाने शुल्क ठरवून दिले आहे. आता महानगरपालिकेला अंमलबजावणी करताना खासगी मोबाइल कंपन्यांची अडवणूक करता येणार नाही, असे नवे धोरण आहे.

# शेंदोळा खुर्द परिसरात शेतीपयोगी साहित्य चोरीच्या प्रमाणात वाढ

## शेतकरीवर्ग हताश: बैलगाडीचे लोखंडी चाकेही लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१ तिवसा**

आदर्श ग्राम शेंदोळा खुर्द येथील शेतकऱ्यांच्या शेती विषयक बैलगाडीचे दोन लोखंडी चाके अज्ञात चोरट्यांनी रात्रीला लंपास केली असल्याची घटना शुक्रवार २० जून रोजी सकाळी उघडकीस आली आहे.

मोलरी, शेदोका शिठणगाठ या परिसरातील शेतकऱ्याचे शेतीयुक्त साहित्याचे मागील काही महिन्यांपासून चोरट्धानी लक्ष केंद्रित केले असून शेतातील पाज्याच्या मोटारी, नोझल सिंलकर पाईप आदी शेतीविषयक साहित्य, अवजारे चोरीला गेले आहे. यात आज पेरणोत्ताठी शेतात बी-बियाणे ने आण करणारे शेतकऱ्यासाठी उपयुक्त असणारे बैलगाड़ी याचे दोन्ही लोखंडी चाके काढून चोरट्यांनी चोरी करून फरार झाले आहे.आदर्श ग्रान शेदोका खुर्द येथील साहेबराव पांडुरंग कुंजेकर (५८) यांच शेत राष्ट्रीय महामार्ग बायपासला लगत असूनते सकाळी ६.३० वाजता आपल्या शेतात गेले असता त्यांच्या शेतात



असलेल्या बैलगाडीचे दोन्ही चाके आढळून आली नाही अज्ञात चोरट्यानी रात्रीला ते ऑटोरिक्षाद्वारे घेऊन गेले. घटना स्थळी तिनचाकी चाकी ऑटोरिक्षा यांचे निशान शेतकऱ्याला आढळून आले.सदर बैलगाडीला बसवलेली लोखंडी दोन चाके अंदाजे २ किंटल वजनाचे होते. यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान तर झालेचः मात्र ऐन शेती हंगामात शेतक-यांसाठी आधारस्तंभ असलेल्या बैलगाडीचे चाकेच चोरट्यांनी नेल्यानी या कष्टकरी शेतकऱ्यांसमोर अपंगत्व आले आहेआजूबाजूच्या परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतीविषयक अवजारे चोरीला जात आहे. त्यावे शेतीलापूरक पाळीव जनावरे आदीचे चोऱ्यांचे प्रमाण व आता लुटमारीच्या घटनावे प्रमाण वाढत आहे. शेतकरी आधीच कर्जबाजारी, सरकार मायबापाची वक्र दृष्टी, त्यातच पुन्हा शेतकऱ्यावर चोरट्यांची करडी नजर यामुळे शेतकरी हतबल झाला आहे. या वाढत्या चोरीच्या घटनांवर पोलिस प्रशासनाने लक्ष देण्यावी सागणी तालुक्यातील शेतकरी वर्गाकडून होत आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिवस जिल्ह्याभरात साजरा

## विभागीय क्रीडा संकुलात अधिकाऱ्यांचा योगा



आंतरराष्ट्रीय योगदिना निमित्ताने आज शासनाचे विविध विभाग व विविध संघटनांच्या सहकार्याने अमरावतीत विभागीय क्रीडा संकुलात आणि केंद्रीय संचार ब्युरो क्षत्रिय कार्यालय अमरावती, वतीने शिवाजी बहुउद्देशीय माध्यमिक शाळेत आज सकाळी योगाभ्यास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अमरावती विभागीय क्रीडा संकुलातील कार्यक्रमात विभागीय आयुक्त श्वेता सिंघल जिल्हाधिकारी आशिष येरेकर,आमदार संजय खोडके,क्षेत्रीय प्रचार अधिकारी शशिकांत पवार आदी सहभागी झाले होते. यावेळी विविध महाविद्यालयाचे विद्यार्थी, योग प्रसारक, क्रीडापटू,मान्यवर सहभागी झाले होते.तर पोलिस मुख्यालयाच्या मैदानामध्येही पोलिस अधिकारी व् कर्मचाऱ्यांनी योगा केला.

# नातेवाईकांना लाभ, १.२० कोटींचा घोटाळा?

## विभागीय कृषी सहसंचालक लहाळेंवर गंभीर आरोपांची मालिका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

विभागीय कृषी सहसंचालक (जेडीए) प्रमोद लहाळे यांच्या अनियमित व भ्रष्ट कारभारासंदर्भात लोकमतने प्रसिद्ध केलेल्या वृत्तमालिकेच्या पार्श्वभूमीवर शासन हालचालींना वेग आला आहे. या प्रकरणात आमदार सुरेश धस यांनी कृषी आयुक्त तसेच प्रधान सचिव (कृषी) यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. याची गंभीर दखल घेत प्रधान सचिवांनी २४ तासांत सविस्तर अहवाल मागवला आहे.

या चौकशीसाठी कृषी आयुक्त सुरज मांढरे यांनी अकोल्याच्या बीज प्रमाणीकरण यंत्रणेचे संचालक अंकुश माने यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली असून, १५ दिवसांत मुद्देसूद अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.



प्रमोद लहाळे यांनी वेगवेगळ्या पदांवर कार्यरत असताना नातेवाइकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, वर्ग-४ पेपरफूट प्रकरणातील सहभाग, निवडणूक आयुक्तांचे आदेश डावलून बदल्या करणे, १.२० कोटींचा किट खरेदीत भ्रष्टाचार, वसुलीच्या बदल्या आदी गंभीर आरोप आमदार धस यांच्या तक्रारीत नमूद आहेत. लहाळे यांच्या सेवानिवृत्तीस अवघे ४० दिवस उरले.

### काय आहेत चौकशीचे आदेश?

राज्य शासनाचे कार्यासन अधिकारी विशाल टेके यांनी १९ जून रोजी कृषी आयुक्त पुणे यांना पत्र पाठवून, लहाळे यांच्यावरील आरोपांची सविस्तर वस्तुस्थिती व प्रस्ताव २० जूनपर्यंत सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या पत्रात प्रधान सचिव (कृषी) यांच्या स्पष्ट सूचना नोंदवण्यात आल्या आहेत. असताना चौकशीच्या हालचालींमुळे त्यांची अडचण वाढली आहे. दरम्यान, ते दोन दिवसांपासून मुंबई-पुणे दौऱ्यावर असल्याचे समजते.